# हापूस



## मराठी शिक्षक पुस्तिका

## 3


**संकल्पना**
अनुज गुप्ता

**लेखिका**
मिनाक्षी आनंदा पवार

**संपादक**
विद्या रायकर



Harbour Press®
INTERNATIONAL

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना (अजाण आम्ही तुझी लेकरे) | ३ |
| २. | चित्रकथा | ४ |
| ३. | घमेंडी मोर | ५ |
| ४. | आला पाऊस आला | ६ |
| ५. | जरा जाणूया! | ७ |
| ६. | मूर्ख गाढव | ८ |
| ७. | ऊठ मुला! | ९ |
| ८. | चाचा नेहरू | ११ |
| ९. | चांदोमामा | १३ |
| १०. | आपले सण व उत्सव | १४ |
| ११. | काय करता? | १४ |
| १२. | कपिला गाय | १६ |
| १३. | रानफुला | १७ |
| १४. | बिरबलाचे चातुर्य | १८ |
| १५. | आळशी माकड | १९ |

# १ प्रार्थना (अजाण आम्ही तुझी लेकरे)

✦ **काव्य परिचय**

- प्रार्थनेद्वारे देवाला मुले सांगत आहे की आम्ही तुझी अजाण लेकरे आहोत आणि तुझ्या गुणांच्या कथा गातो.
- या भूतलावर सर्व घटकांचा निर्माता तूच आहे.
- तुला अनेक नावे असून संपूर्ण आसमंतात तूच आहे. तू कोणातही फरक करत नाही. सर्वांवर समान माया तू करतोस.
- तुझ्याकडून आमची एकच मागणी आहे की आम्ही खूप काम करावे आणि आमच्या मनामध्ये द्वेष नसावा तर केवळ प्रेमाचीच भावना असावी ही आमची इच्छा तू पूर्ण करावी.

✦ **उद्देश**

- प्रार्थना म्हणजे काय? प्रार्थनेचे प्रत्येकाच्या मनातील स्थान समजावून सांगणे.
- विद्यार्थ्यांना जीवनात प्रार्थनेचे महत्त्व काय? याची जाणीव करून देणे.
- प्रार्थनेमुळे होणारे फायदे समजावून सांगणे.
- प्रार्थनेचा मूळभाव विद्यार्थ्यांना समजणे.
- विद्यार्थ्यांमध्ये भाषेविषयी व नवीन शब्द जाणून घेण्याची रुची निर्माण करणे.
- मराठी भाषेविषयी आवड निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना प्रथम एखादी प्रार्थना किंवा शाळेची प्रार्थना ऐकवणे.
- प्रार्थना संपल्यानंतर विद्यार्थ्यांना विविध प्रश्नातून पुस्तकातील प्रार्थना या विषयापर्यंत नेणे.

  **उदाहरण** -

- प्रार्थना म्हणून झाल्यावर तुम्हाला कसे वाटते?
- तुम्ही कोणती प्रार्थना म्हणता?

अशा विविध प्रश्नातून विद्यार्थ्यांच्या मनातील प्रार्थनेविषयी काय विचार आहेत हे जाणून घेता येईल. आपण आज अशीच एक नवीन प्रार्थना शिकणार आहोत अशा वाक्याने पुस्तकातील प्रार्थना या विषयापर्यंत विद्यार्थ्यांना नेता येईल.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून नवीन शब्दांचे अर्थ काढून घेत प्रार्थनेचा अर्थ समजावून सांगावा. विद्यार्थ्यांना छोटे-छोटे प्रश्न विचारत प्रार्थनेचा अर्थ समजला आहे की नाही हे पडताळून घ्यावे.

पाठ्यपुस्तकातील प्रार्थना शिकविण्याअगोदर / प्रार्थनेचा अर्थ समजावून देण्याअगोदर प्रार्थना चालीवर म्हणवून दाखवावी.

✦ **सामूहिक कार्य**

- विद्यार्थ्यांना **अजाण आम्ही तुझी लेकरे....** ही प्रार्थना पाठांतरासाठी देणे.
- विद्यार्थ्यांचे १०-१० चे गट करून प्रार्थना म्हणण्यास सांगणे.
- प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या गटात प्रार्थना म्हणण्यास सांगणे.

# २ चित्रकथा

✦ **चित्रकथा**

- चित्र व त्यावर आधारित प्रश्न व उत्तरांतून विद्यार्थ्यांना चित्रवर्णन ह्या विषयांची ओळख.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना प्रत्येक वस्तूला निरीक्षणपूर्वक बघता येणे.
- विचारांना चालना मिळणे.
- विद्यार्थ्यांना मराठी शब्द व वाक्ये यांचा सराव होणे.
- विद्यार्थ्यांना मराठी विषयाची आवड निर्माण होणे.
- चित्रकथेतून विद्यार्थ्यांना चित्र पाहून उत्तरे देता येणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना प्रथम पुस्तकातील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगणे.
- चित्राच्या प्रत्येक घटकांची नावे विचारणे.
- चित्रातील कोण, काय-काय क्रिया करत आहेत ते विचारणे.
- चित्रातील प्रत्येक घटकांची शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करणे.
- आजूबाजूच्या इतर गोष्टींवरही चर्चा करणे.
- शिक्षकांनी चित्र व विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रसंग यांची सांगड घालून अनुभव व्यक्त करण्यास सांगणे.

**उदाहरण** -

१. चित्रात मुलगी व मुलगा झाडावर चढला आहे त्याप्रमाणे तुम्ही कधी झाडावर चढला आहात का?

२. त्यावेळी काही गंमत झाली होती का? अशाप्रकाराचे प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना उत्तरे देण्यास प्रोत्साहित करणे.

- त्यानंतर चित्राखालील प्रश्नांच्या उत्तराचे एका शब्दात उत्तर देण्यास सांगावे.
- दिलेल्या प्रश्नांच्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना चित्राकडे बघून आणखी काय-काय दिसते ते विचारावे.
- विद्यार्थ्यांना त्यांची मते मांडण्यास सांगावी.

✦ **उत्तरे**

१. चित्रात एकूण तीन मुलगे आहेत.

२. चित्रात एकूण तीन मुली आहेत.

३. चित्रात कुत्रा हा प्राणी दिसत आहे.

४. मुलीला गोष्ट आजी सांगत आहे.

५. मुलगी सायकल चालवत आहे.

६. झाडावर एक मुलगा व एक मुलगी चढले आहेत.

# ३ घमेंडी मोर

## ✦ पाठ परिचय

- चित्रे व वाक्ये यांची सांगड घालत कथालेखन याविषयाची ओळख.

## ✦ उद्‌देश

- विद्‌यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढवून अचूक व योग्य शब्दज्ञान अवगत होणे.
- लक्षपूर्वक वाचन करणे, शब्दांचा योग्य वापर व वाक्ये यांची सांगड घालून विद्‌यार्थ्यांना गोष्ट तयार करता येणे.
- निरीक्षण क्षमतेत वृद्‌धी करणे व विचारांना चालना मिळणे तसेच मराठी नवनवीन शब्दांचे ज्ञान प्राप्त होणे.
- वाक्ये तयार करता येणे.
- विद्‌यार्थ्यांना मराठी विषयाची आवड निर्माण करणे.

## ✦ अध्यापन कृती

- विद्‌यार्थ्यांना प्रथम पुस्तकातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगणे.
- त्या चित्रांची नावे सांगण्यास प्रोत्साहित करणे.
- त्यानंतर चित्रांच्या जागी चित्रांची नावे उच्चारून संपूर्ण गोष्ट वाचण्यास सांगणे.
- पाठाखालील प्रश्नांची उत्तरे विचारून घेणे.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. सर्वजण मोराचे कौतुक करत होते.
२. मोराच्या डोक्यावर तुरा आहे.
३. मोर ऐटीत पिसारा फुलवितो.
४. गरुड मोराला गाणे म्हणण्यास सांगतो.

**प्र २.** १. जंगल  २. प्राणी व पक्षी  ३. गरुड  ४. मोर

**प्र ३.** १. सुंदर  २. प्राणी व पक्षी  ३. कौतुक  ४. संपन्न

**प्र ४.** १. लांडोर  २. कोंबडी  ३. चिमणा

**प्र ५.** शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांकडून सुंदर अक्षरात शब्द लिहून घ्यावेत.

## ✦ हसत-खेळत

**प्र ६.** १. जंगल  २. पंख  ३. रंग  ४. सुंदर  ५. संपन्न

## ✦ विचार करा.

१. डोंगर  २. ढग
१. पक्षी  २. उडत
१. कुत्रा  २. राखण
१. धबधबा  २. डोंगरा
१. नदी  २. समुद्राला
१. फूल  २. झेंडूचे
१. झाड  २. फुले, फळे
१. बैलगाडी  २. बैल

# ४ आला पाऊस आला

✦ **काव्य परिचय**

- पाऊस अचानक पडला आहे; त्यामुळे मुले घराकडे पळत आहेत.
- ढगांचा गडगडाट ऐकू येत आहे; त्यामुळे आता जोरात पाऊस पडेल असे वाटून सर्वजण घरी धूम ठोका असे सांगत आहे.
- धावत-धावत मुलांनी घर गाठले आहे. त्यामुळे मुले निश्चिंतपणे पावसाला सांगत आहे की तू आता दिवसभर पडलास तरी चालेल.
- पाऊस मुसळधार पडत आहे; त्यामुळे पावसाला राग आला आहे असे वाटत आहे व त्यामुळे मुलगा घाबरून आईच्या कुशीत लपून बसला आहे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना अचानक पाऊस पडल्यानंतर येणाऱ्या धमालीचे वर्णन मनोरंजक पद्धतीने कल्पना करून अनुभवण्यास लावणे.
- कवितेमार्फत मराठीतील नवीन शब्दांची ओळख करून देणे.
- कवितेचा मूळभाव विद्यार्थ्यांना समजणे.
- मराठी भाषेविषयी आवड निर्माण करणे.
- कवितेतून पाठांतराची सवय लावणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांसमोर पावसाच्या वातावरणाची स्थिती निर्माण करणे.
- येरे येरे पावसा..... यासारखे पावसावर आधारित बालगीत विद्यार्थ्यांकडून तालासुरात गात म्हणावे.
- पावसात वातावरणात होणारे बदल यावर छोटे-छोटे प्रश्न विचारणे.
  उदाहरण-पावसात झाडे, वेली, पक्षी, सारी सृष्टी कशी दिसते?
- तुम्ही पावसात काय-काय मजा करता?

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपण आज अशीच पावसाची एक कविता शिकूया अशा पद्धतीने **आला पाऊस आला** या विषयापर्यंत आणणे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून नवीन शब्दांचे अर्थ विचारत कवितेचा अर्थ समजावून सांगावा. विद्यार्थ्यांना छोटे-छोटे प्रश्न विचारत कवितेचा अर्थ समजला आहे की नाही हे पडताळून घ्यावे.

✦ **सामूहिक कार्य**

- **आला पाऊस आला** ही कविता ताला-सुरात व अभिनयासह म्हणवून घेणे.
- विद्यार्थ्यांचे गट करून कविता म्हणण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. पाऊस सर-सर पडतो.

२. मुलांनी धावता धावता घर गाठले.

३. मुलगा पावसाला चिडून-चिडून पड असे सांगतो.

४. मुलगा भरभर घरी चला असे सांगत आहे.

५. मुलगा आईच्या कुशीत दडून बसणार आहे.

प्र २. १. पाऊस पडतो, सर सर सर
घरी चला रे, भर भर भर!
२. धावता, धावता गाठले घर
पड रे पावसा दिवसभर!
३. पड रे पावसा, चिडून चिडून
आईच्या कुशीत, बसलो दडून!
४. पाऊस वाजे, धडाड् धूम
धावा, धावा ठोका धूम!

प्र ३. १. पाऊस- आज सकाळी जोरात **पाऊस** पडला होता.
२. धूम- शाळेची सुट्टी होताच मुलांनी **धूम** ठोकली.
३. घर- माझे **घर** खूप मोठे आहे.
४. कुशीत- मला रोज आईच्या **कुशीत** झोपायला आवडते.
५. दिवसभर- मी आज **दिवसभर** खूप काम केले.

प्र ४. १. वर-वर हर-हर घर-घर
२. रडून फाडून झाडून

## ५ जरा जाणूया!

### ✦ पाठ परिचय

- विद्यार्थी आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्येक गोष्टींकडे किती लक्षपूर्वक बघतात हे जाणून घेणे.
- विद्यार्थ्यांना प्रत्येक गोष्टींचे ज्ञान किती सखोल असते हे जाणणे.
- छोट्या-छोट्या प्रश्नांच्या उत्तरातून विद्यार्थ्यांना मराठी शब्दांचे ज्ञान मिळणे.
- **आंबा** या फळाची माहिती.
- **मोर** या पक्षाची माहिती.
- **फुलपाखरू** या कीटकाविषयीची माहिती.
- **मांजर** या पाळीव प्राण्याविषयीची माहिती.
- **सिंह** या जंगली प्राण्याविषयीची माहिती.

### ✦ उद्देश

- विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानात भर पाडणे.
- विद्यार्थ्यांचे मराठी शब्दभांडार वाढविणे.

### ✦ अध्यापन कृती

- फळांचा राजा कोण?
- विद्यार्थ्यांना **आम** हे उत्तर माहीत असते तेव्हा आमला मराठी शब्द कोणता आहे? तो शब्द विचार करून सांगण्यासाठी प्रोत्साहन देणे. त्या फळाविषयीची अधिक माहिती विचारून घेणे. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानात भर घालता येईल.
- विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला एक प्रश्न अशाप्रकारे पुस्तकातील प्रश्न विचारून खेळातून हा पाठ शिकवावा.
- विद्यार्थ्यांना त्या प्रश्नांची उत्तरे वहीत लिहिण्यास व चित्रे चिटकवण्यास सांगावी.

✦ उत्तरे

**आंबा**

१. या फळाचे नाव आंबा आहे/हे फळ आंबा आहे.

२. आंब्याचा रंग पिवळा/केशरी असतो.

३. फळांचा राजा आंबा आहे.

४. आंब्यापासून आमरस, आंबावडी, वेगवेगळी थंडपेय, आंब्याचा मिल्कशेक, आंब्याचे आईस्क्रिम, आंब्याची पोळी, आंब्याची बर्फी..... असे वेगवेगळे पदार्थ बनतात.

५. आंबा कच्चा असतो तेव्हा त्याला 'कैरी' असे म्हणतात.

**मोर**

१. हा पक्षी मोर आहे.

२. मोर नदीकाठी, सखल भागात किंवा गर्द झाडाझुडपात राहतो.

३. मोराचा तुरा डोक्यावर आहे.

४. मोर थुई-थुई नाचतो.

५. आपला राष्ट्रीय पक्षी मोर आहे.

**फुलपाखरू**

१. हे चित्र फुलपाखराचे आहे.

२. फुलपाखराला दोन डोळे आहेत.

३. फुलपाखरू रंगीबेरंगी असते.

४. फुलपाखरू फुलांवर असतात.

५. फुलपाखराला न पकडता त्याची गंमत दुरूनच बघावी; कारण त्याचे पंख खूप नाजूक असतात. त्यामुळे फुलपाखराला पकडल्यावर त्याचे पंख तुटण्याची शक्यता असते.

**मांजर**

१. हे चित्र मांजरीचे आहे.

२. मांजर हा पाळीव प्राणी आहे.

३. मांजर दूध पिते.

४. मांजरीला वाघाची मावशी म्हणतात.

५. मांजर उंदराला पकडते.

**सिंह**

१. हे चित्र सिंहाचे आहे.

२. जंगलाचा राजा सिंह आहे.

३. सिंहाचा रंग पिंगट पिवळा असतो.

४. सिंह जंगलात राहतो.

५. सिंहाच्या ओरडण्याला 'गर्जना' म्हणतात.

## ६ मूर्ख गाढव

✦ **पाठ परिचय**

- दोन गाढव चांगले मित्र असणे व त्यांचे एकदा जंगलात फिरणे.
- जंगलात फिरताना गाढवांना सिंहांचे कातडे सापडणे.
- गाढव सिंहांचे कातडे घालून सगळीकडे फिरू लागणे.
- त्यांना पाहून सर्व प्राणी घाबरून पळणे.
- आनंदाने ते एका शेतात जाणे. शेतात काम करणारे शेतकरीही सिंहाला बघून पळून जाणे.

- शेतातील पिके खाण्यास सुरुवात केल्यानंतर शेतकऱ्यांना ते सिंह नसल्याचे समजणे.
- काठ्या घेऊन शेतकऱ्यांचे गाढवाला मारणे व गाढवांचे ओरडत-ओरडत पळून जाणे.

### ✦ उद्देश

- विद्यार्थ्यांना छोट्या-छोट्या गोष्टीतून पाठ या विषयाची ओळख करून देणे.
- पाठातून नैतिक मुल्यांची शिकवण देणे.

### ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माहीत असलेली एखादी गोष्ट वर्गात सांगण्यास प्रवृत्त करावे.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठामधील **मूर्ख गाढव** हीच गोष्ट आवाजाच्या चढ-उतारासह तसेच अभिनयातून सांगावी.
- विद्यार्थ्यांना त्यावर प्रश्न विचारावेत.
- त्यानंतर पाठ शिकवावा. त्याचा अर्थ विद्यार्थ्यांना सांगण्यास प्रोत्साहित करणे.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

### ✦ सामूहिक कार्य

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून पाठातील गोष्ट सादर करण्यास सांगावी.

### ✦ उत्तरे

**प्र १.** १. गाढव फिरता-फिरता जंगलात गेले.
२. जंगलात गाढवांना दोन सिंहांचे कातडे सापडले.
३. गाढव सर्वांना सिंह म्हणून घाबरवू लागले.
४. कोवळी पिके बघून गाढवांच्या तोंडाला पाणी सुटले.

**प्र २.** १. सिंहांचे २. शेतकरी ३. गाढव
४. काठ्या ५. शेतात

**प्र ३.** १. अरण्य, वन, कानन २. हर्ष, खुशी
३. शिवार, वावर ४. सखा, सोबती

**प्र ४.** १. शत्रू २. दुःख ३. जवळ ४. वाईट

**प्र ५.** १. फेकत-फेकत, शेकत-शेकत २. हळू, दळू

### ✦ हसत-खेळत

**प्र ६.** विद्यार्थी आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार त्यांना ज्ञात असलेली गोष्ट वर्गात सांगतील.

## ७ ऊठ मुला!

### ✦ काव्य परिचय

- आई मुलाला आता सकाळ झाली आहे. आता तू ऊठ असे सांगत आहे.
- आई मुलाला सांगते की झाडावर बघ किती पक्षी आहेत व ते तुला बागडायला तसेच सूर्याचे गुणगान गायला बोलवत आहेत.
- फुलांवर फुलपाखरे फिरतात, पानांवर दवबिंदू पडले आहेत व पाने जशी हलतात तसे ते थरथरत आहेत, आकाशात पाखरे उडत आहेत.
- आज सकाळ खूप प्रसन्न आहे. सर्व ठिकाणी प्रसन्नतेचे वातावरण आहे. पक्षी, झाडे, वेली हे

सर्व बघून आनंदात ह्या सर्वांची मजा घेत आहेत. आता तू सुद्धा लवकर उठून तयार हो आणि ह्या प्रसन्न सकाळची मजा घे.

## ✦ उद्‌देश

- विद्‌यार्थ्यांच्या मनात निसर्गप्रेमाची भावना निर्माण करणे.
- सकाळच्या प्रसन्न वातावरणाचे निरीक्षण करण्यास शिकविणे.
- सकाळच्या वेळी निसर्गात होणारे बदल अनुभवणे.
- कवितेमार्फत मराठीतील नवीन शब्दांची ओळख करून देणे.
- कवितेचा मूळभाव विद्‌यार्थ्यांना समजणे.
- मराठी भाषेविषयी आवड निर्माण करणे.
- कवितेतून पाठांतराची सवय लावणे.

## ✦ अध्यापन कृती

- विद्‌यार्थी शक्यतो पहाटे सहलीला जाताना उठतात व ते खूप उत्साही असतात. त्यांना त्यावेळची पहाट व त्यावेळचे वातावरण खूप आठवणीत राहील असे असते, याचा आधार घेत विद्‌यार्थ्यांना प्रश्न विचारावेत.

किंवा

- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांना काही प्रश्न विचारून उत्तरे देण्यास सांगावीत.

१. तुम्ही कधी पहाटे उठले आहात का? कधी?

२. पहाटेच्या वेळी आकाश कोणत्या रंगाचे असते?

३. पहाटेच्या वेळी पक्षी, प्राणी काय-काय करतात ते बघितले आहे का? त्याचे वर्णन करा.

- या प्रश्नांतून मिळणाऱ्या उत्तरांचा आधार घेत छोटे-छोटे प्रश्न विचारून कवितेचा अर्थ प्रथम समजावणे. नंतर कविता वाचून अर्थाची पुनरावृत्ती करावी.
- कवितेखालील प्रश्न विचारून विद्‌यार्थ्यांना कविता किती समजली आहे याचा पडताळा घ्यावा.

## ✦ सामूहिक कार्य

- ऊठ मुला! ही कविता ताला-सुरात व अभिनयासह म्हणवून घेणे.
- विद्‌यार्थ्यांचे गट करून कविता म्हणण्यास सांगणे.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. या कवितेत सकाळच्या प्रसन्न वातावरणाचे वर्णन केलेले आहे.
२. पानांवर दव थरथरत आहेत.
३. कवितेत रविराजा (सूर्य) खूश आहे.
४. फुलपाखरे फुलांवर फिरत आहेत.
५. मुलाला चिऊ, काऊ, मैना साद घालत आहेत.

**प्र २.** १. पक्षी, <u>झाडे, वेली हे सर्व बघती</u>
<u>चल तुही बघ</u> मजा किती।।
२. म्हणती <u>चल रे बागडायला</u>
<u>रविराजाचे गुणगान</u> गायला।।

**प्र ३.** १. सूर्य २. लता ३. गगन ४. मौज ५. पवन

**प्र ४.** १. चिमणी २. कावळा ३. मैना

**प्र ५.** १. साडी माडी नाडी
२. नक्षी साक्षी कामाक्षी

## परिसर स्वच्छता

✦ **पाठ परिचय**

- छोट्या-छोट्या कृतीतून परिसर स्वच्छतेची ओळख.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना चांगल्या-वाईट सवयींची ओळख करून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून चांगल्या व वाईट सवयींची माहिती करून देणे.
- विद्यार्थ्यांना चित्रात मुले-मुली चुकीचे वर्तन करत आहेत आणि असे वर्तन करणे चुकीचे आहे हे त्यांच्या मनावर बिंबवणे व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आपले कोणते कर्तव्य, जबाबदारी आहे याची जाणीव करून देणे.
- चित्राखालील व पाठाखालील अभ्यास कार्य विद्यार्थ्यांकडून करून घेणे.

✦ **उत्तरे**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्र १.** | १. | बरोबर | २. | बरोबर | ३. | बरोबर | ४. | बरोबर | ५. | चूक |
| | ६. | चूक | ७. | चूक | ८. | बरोबर | ९. | बरोबर | १०. | बरोबर |
| **प्र २.** | १. | झाडे | २. | हवा | ३. | डोंगर/पर्वत | ४. | ढग | ५. | समुद्र |

## ८ चाचा नेहरू

✦ **पाठ परिचय**

- नेहरूंचे कार्य.
- नेहरूंची आवड.
- नेहरूंचा वाढदिवस हा बालदिन म्हणून साजरा करण्यामागची कारणे.
- नेहरूंना लोकांनी दिलेली पदवी.
- नेहरूंनी लोकांना दिलेला मंत्र.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना एका नेत्याविषयी माहिती मिळवून देणे.
- पाठातून पंडित नेहरू यांचा परिचय, त्यांची आवड, त्यांचे विचार यांची ओळख करून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यपर गीत ऐकवून स्वातंत्र्यवीर नेत्यांची नावे सांगण्यास सांगणे.

किंवा

- एका विद्यार्थ्याला नेहरूंची वेशभूषा करून येण्यास सांगणे. त्याच्या वेशभूषेच्या आधारे शिक्षकांनी नेहरूंविरूायी विद्यार्थ्यांना माहीत असलेली माहिती छोट्या-छोट्या प्रश्नांतून काढून घेण्याचा प्रयत्न करणे.
- पाठाचा अर्थ विद्यार्थ्यांकडून विचारत पाठ शिकवावा.
- पाठाखालील प्रश्नांच्या उत्तरांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. चाचा नेहरू (पंडित जवाहरलाल नेहरू) हे मुलांचे आवडते नेते होते.

२. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४ नोव्हेंबर, १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला होता.

३. चाचा नेहरूंच्या आईचे नाव **स्वरूपरानी नेहरू** व वडिलांचे नाव **मोतीलाल नेहरू** असे होते.

४. चाचा नेहरूंचे वडील अलाहाबादमधील विख्यात आणि श्रीमंत वकील होते.

५. चाचा नेहरूंना लहान मुले व गुलाबाची फुले फार आवडत असे.

६. नेहरूंचा जन्मदिवस आपण 'बालदिन' म्हणून साजरा करतो.

**प्र २.** १. पंतप्रधान २. गुलाबाचे ३. चाचा नेहरू ४. आवडते ५. शांतिदूत

**प्र ३.** १. पुष्प २. जास्त ३. प्रगती ४. राष्ट्र ५. सतत

**प्र ४.** १. पारतंत्र्य २. नावडते ३. गरीब ४. स्वदेश

**प्र ५.** १. मला लहान **मुले** खूप आवडतात.

२. स्वच्छ **भारत** हे गांधीजींचे स्वप्न होते.

३. प्रत्येकाची **आवड** वेगवेगळी असते.

४. माझा मित्र खूप **श्रीमंत** आहे.

५. **गरीब** लोकांना नेहमी मदत करावी.


✦ **हसत-खेळत**

**प्र ६.** १.



महात्मा ज्योतीराव फुले

२.



महात्मा गांधी

३.



लोकमान्य टिळक

४.



सुभाषचंद्र बोस

५.




सरदार वल्लभभाई पटेल

६.



विनायक दामोदर सावरकर

७.



चंद्रशेखर आझाद

# ९ चांदोमामा

## ✦ काव्य परिचय

- मुलांचा चांदोबाला उद्‌देशून केलेला संवाद.
- चांदोबा व त्याचे घर, त्याच्याबद्‌दल मुलांना असलेली काळजी व्यक्त केली आहे.
- त्याला हळूवार चालण्यासाठी व लिंबोणीच्या झाडामागे लपण्यास सांगितले आहे.
- ते लिंबोणीचे झाड खूप छान आहे व आई ही तुझ्यासारखीच गोरी गोरी पान आहे असे सांगितले आहे.
- आईचा तू भाऊ असल्यामुळे तिचा चेहराही गोरा गोरा पान आहे.
- तुझ्यासाठी गोड-गोड खाऊ केला आहे. त्यामुळे तू आता आळीमिळी गुपचिळी म्हणजे गप्प राहणे सोड व आमच्याशी बोल असा आग्रह धरत आहे.

## ✦ उद्‌देश

- विद्‌यार्थ्यांना कवितेतून मराठी विषयाची आवड निर्माण करणे.
- कवितेतून चांदोमामा याचे विद्‌यार्थ्यांना असलेले कुतूहल वाढविणे.

## ✦ अध्यापन कृती

- शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांना चांदोबा-चांदोबा भागलास का? यासारखी कविता म्हणण्यास सांगणे.
- चांदोमामाविषयी त्यांना असलेले कौतुक समजून घेणे.
- विद्‌यार्थ्यांना कवितेचा अर्थ समजावणे व विचारून घेणे.
- शिक्षकांनी कविता तालासुरात म्हणावी. नंतर विद्‌यार्थ्यांना त्याचे अनुकरण करण्यास सांगणे.

## ✦ उत्तरे

**प्र १.** १. चांदोमामाचं घर लांब आहे.
२. चांदोमामाचे चालून पाय दुखतील.
३. लिंबोणीचं झाड छान-छान आहे.
४. आई चांदोमामासारखी गोरी-गोरी पान आहे.
५. आईचा भाऊ चांदोमामा आहे.

**प्र २.** १. चालून २. लिंबोणीच्या ३. खाऊ
४. गुपचिळी ५. घर

**प्र ३.** १. शशी २. दूर ३. वृक्ष
४. माता ५. तोंड

**प्र ४.** १. छान छान छान २. गोरी गोरी पान
३. गोल गोल गोल ४. गुपचिळी
५. गोड गोड गोड

**प्र ५.** १. जवळ २. पुढे ३. कडू

**प्र ६.** १. थांब-थांब २. झप-झप ३. लप-लप
४. छान-छान ५. गोरी-गोरी ६. गोल-गोल
७. बोल-बोल ८. सोड-सोड ९. गोड-गोड

## १० आपले सण व उत्सव

✦ **पाठ परिचय**

- मराठी सण व त्यांची नावे.
- प्रश्नातून सणांची माहिती.
- विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या सणांविषयी चर्चा.
- विद्यार्थी जे सण साजरे करतात त्याविषयी चर्चा.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविणे.
- विद्यार्थ्यांना सर्व धर्मांच्या सणांविषयी ज्ञान देणे.
- इतर धर्मांच्या रूढी-परंपरेविषयी आदर विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी प्रश्नोत्तरांच्या मदतीने **सण** हा विषय विद्यार्थ्यांकडून काढून घेणे.
- वर्गात प्रत्येक सणाविषयीचे चित्र दाखवून किंवा गाणे ऐकवून सण ओळखण्यास सांगावे.
- त्या सणांविषयीची माहिती विद्यार्थ्यांकडूनच छोट्या-छोट्या प्रश्नांच्या उत्तरातून काढण्याचा प्रयत्न करावा.
- सणाचे नाव काय आहे?
- सण कधी येतो?
- सण कसा साजरा करतात?
- सणाला कोणते पदार्थ केले जातात?

विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीवर सविस्तर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. चित्रात दिवाळी, गुढीपाडवा, नाताळ, होळी, ईद, रक्षाबंधन हे सण आले आहेत.
२. मुले किंवा विद्यार्थी त्यांच्या आवडीचा सण सांगून तो सण का आवडतो? ते सांगतील.
३. प्रत्येक विद्यार्थी साजरे करणाऱ्या सणांची नावे सांगतील.
४. विद्यार्थी त्यांच्या घरी परंपरेनुसार कोणते सण साजरे होतात ते वर्गात सांगतील.

## ११ काय करता?

✦ **काव्य परिचय**

- प्राणी व त्यांचे कार्य किंवा प्राण्यांच्या दैनंदिन जीवनावर चर्चा.
- बैलांचे शेतकऱ्यांना मदत करणे.
- मुंगीच्या कामातून आपण आपले काम करत पुढे चालत राहायचे असते असा संदेश देणे.
- ससा हा आनंदी प्राणी नेहमी गाजर खाण्यात गुंग असतो.
- मांजर घरातील उंदीर पकडून आपल्याला मदतच करत असते.
- चिमणी ही नेहमी आपल्या बाळासाठी घरट्यात अंथरूण बनवते.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना कवितेतून मराठी विषयाची आवड निर्माण करणे.
- कवितेतून प्राणी व त्यांचे उपयोग, कार्य किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनचर्या याविषयी माहिती मिळवून देणे.
- प्राणी व त्यांचे आपल्याला होणारे उपयोग याची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही प्रश्नातून कवितेची माहिती काढावी.

**उदाहरण-**

- बैलदादा हा कोणाचा मित्र आहे? कसा?
- बैल शेतकऱ्याला काय मदत करतो?
- ससा काय खातो?

अशा प्रकारच्या प्रश्नातून विद्यार्थ्यांकडून सामूहिकरीत्या कवितेचा अर्थ नकळत काढून घ्यावा व नंतर अर्थासह कविता शिकवावी.

- कवितेखालील प्रश्नांवर चर्चा करावी.
- शिक्षकांनी कविता तालासुरात म्हणावी. नंतर विद्यार्थ्यांना त्याचे अनुकरण करण्यास सांगणे.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. चिऊताई बाळासाठी मऊ-मऊ गादी करत होती.
२. ससेभाऊ शेतातले लाल-लाल गाजर खात आहे.
३. मुंगी आपल्याला पुढे चालायचा संदेश देत आहे.
४. या कवितेतील मुलगा बैलदादा, चिऊताई, ससेभाऊ, मनीमाऊ व मुंगीताई यांना प्रश्न विचारत आहे.

**प्र २.** १. बैलदादा, बैलदादा काय करता?
<u>शेतकऱ्याला त्याच्या कामात मदत</u> करतो.
२. मनीमाऊ, मनीमाऊ <u>काय करता</u>?
<u>घरातल्या उंदरांचा</u> पाठलाग करते.

**प्र ३.** १. बरोबर २. बरोबर ३. चूक ४. चूक

**प्र ४.** १. उंदरांचा पाठलाग करते.
२. गाजर खातो.
३. पुढे-पुढे चला संदेश देते.
४. शेतकऱ्याला मदत करतो.

✦ **हसत खेळत**

**प्र ५.** १. कोकिळा २. पोपट ३. कुत्रा ४. गाय
५. घोडा ६. कावळा ७. मोर

## शब्दकोडे

| उभे शब्द | | आडवे शब्द | |
|---|---|---|---|
| १. | कढई | १. | कणीक |
| २. | रविवार | २. | ईश्वर |
| ३. | नक्कल | ३. | विमान |
| ४. | पंढरपूर | ४. | लपंडाव |
| ५. | वटवृक्ष | ५. | वृत्तपत्र |
| ६. | पटांगण | ६. | गजानन |
| ७. | नयन | ७. | नथ |

## १२ कपिला गाय

✦ **पाठ परिचय**

- आजीचे संध्याकाळी दिवे लावण्याच्या सवयीचे वर्णन.
- गाईची पूजा करण्याची पद्धत.
- दामिनीला गाईची पूजा करण्यामागचे पडलेले प्रश्न.
- आजीचे दामिनीला गाईला देव मानण्याची कारणे समजावणे.
- गाईचे दूध, शेण इत्यादींचा उपयोग समजावणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना **कपिला गाय** या पाठातून एका प्राण्याची ओळख करून देणे.
- पाठातून **गाय** हा प्राणी व त्याचे देवासमान असलेले स्थान तसेच गाईचे उपयोग याविषयी माहिती देणे.

✦ **अध्यापन कृती**

- आपल्याला दूध कोणकोणत्या प्राण्यांपासून मिळते?
- कोणकोणत्या प्राण्यांची आपण पूजा करतो? यासारख्या प्रश्नातून विद्यार्थ्यांना पाठाचा विषय समजावणे.
- शिक्षकांनी गाईचे चित्र दाखवून त्यांना माहीत असलेली गाईविषयीची माहिती विचारून घ्यावी.
- नंतर कठीण शब्दांचे अर्थ विद्यार्थ्यांकडून विचारत पाठाचा अर्थ समजावून सांगावा.
- पाठाखालील प्रश्नांवर सविस्तर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. हिंदू लोक गाईला देवता मानतात.

२. पाठातील गाईचे नाव कपिला आहे.

३. आजी रोज घरापुढील तुळशीची व कपिला गाईची पूजा करीत असे.

४. गाईचे गोमूत्र हे पूजेसाठी वापरतात.

५. गाय स्वभावाने शांत व गरीब असते.

**प्र २.** १. लहान २. तेहतीस ३. गाईविषयी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ४. | श्रीकृष्णाला | ५. | गोवरी | | | | | | |
| **प्र ३.** | १. | कपिला गाय | २. | दामिनी | ३. | आजी | | | | |
| **प्र ४.** | १. | वंदन | २. | देह | ३. | गृह | ४. | दीन | ५. | जास्त |
| **प्र ५.** | १. | उत्तर | २. | अशांत | ३. | मोठे | ४. | मागे | | |
| **प्र ६.** | १. | बरोबर | २. | बरोबर | ३. | चूक | ४. | चूक | | |

✦ **हसत खेळत**

**प्र ७. अ.** १. वास समोर मोर

२. सण पण रस

३. पाखरू पाल लपा

**ब.** विद्यार्थी आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार निरीक्षण करून प्राण्यांची व पक्ष्यांची नावे लिहितील.

## १३ रानफुला

✦ **काव्य परिचय**

- रानफुला म्हणजेच फुलपाखरू.
- रानफुलाचे तऱ्हेतऱ्हेचे रंग असतात.
- रानफुलाला फुलांतील मध खूप आवडते. रानफूल जेव्हा पानांवर बसतात व पाने हलली की ते झोपाळ्यावर बसले आहेत अशाप्रकारे झुलतात.
- रानफुलाचे पंख हे पाकळ्यांसारखे छोटे-छोटे असतात.
- ह्या रानफुलाचा कवीला लळा लागला आहे व त्याचे फुलपाखरू हे नाव आहे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना कवितेतून मराठी विषयाची आवड निर्माण करणे.
- कवितेतून विद्यार्थ्यांना फुलपाखरांविषयी कुतूहल उत्पन्न करणे.

✦ **अध्यापन कृती**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना **फुलपाखरू** या कीटकाविषयी काही प्रश्न विचारून त्यांचे फुलपाखरांविषयाचे कुतूहल उत्पन्न करणे.
- फुलपाखरू कोठे दिसतात?
- फुलपाखरांचे रंग कोणकोणते असतात?
- फुलपाखरांचे पंख कसे असतात?
- फुलपाखरांना काय आवडते?

अशा प्रकारच्या प्रश्नामधून विद्यार्थ्यांकडून कवितेचा अर्थ नकळत काढून घ्यावा व नंतर अर्थासह कविता शिकवावी.

✦ **सामूहिक कार्य**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून तालासुरात कविता म्हणवून घ्यावी.
- विद्यार्थ्यांना कविता पाठांतर करून येण्यास सांगून विद्यार्थ्यांचे गट करून कविता म्हणण्यास सांगावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. कवितेत फुलपाखराला 'रानफुला' असे म्हटले आहे.

२. फुलपाखरांचा झुला म्हणजे झाडावरील पान.

३. फुलपाखराच्या रंगकला पाकळ्यांसारख्या आहेत.

४. फुलपाखराला बागडण्याची हौस आहे.

**प्र २.** १. मधुरस आवडे गोड तुला।
पानावरती तुझा झुला।।

२. लळा लागला तुझा मला।
फुलपाखरू नाव तुला।।

**प्र ३.** १. रंग २. झुला ३. पंख
४. हौस ५. रंगकला

**प्र ४.** १. बेरंगी २. कडू ३. कुरूप ४. दानव

**प्र ५.** **अ.** १. फुलपाखरे २. पंख ३. पाकळी

**ब.** १. झुरळ २. मधमाशी ३. मुंगी
४. घरमाशी ५. कोळी

## १४ बिरबलाचे चातुर्य

✦ **पाठ परिचय**

- बादशहाला आपल्या सरदारांची परीक्षा घेण्याची सवय असणे.
- बादशहाचे सरदारांना मांजरांची गोजिरवाणी पिल्ले देऊन सहा महिन्यांनी ते पिल्लू घेऊन दरबारात बोलावणे.
- ज्याचे पिल्लू श्रेष्ठ त्याला बक्षीस दिले जाईल असे बादशहाने जाहीर करणे.
- प्रत्येक सरदाराचे पिल्लू घेऊन घरी जाणे व पिल्लाला चांगले खाण्यापिण्यास देणे.
- बिरबलाचे उंदराला फक्त साध्या अन्नावर ठेवल्यामुळे ते हडकुळे राहणे; मात्र उंदीर पकडण्यास तरबेज होणे.
- बादशहाने मांजर दरबारात घेऊन येण्याचा दिवस ठरणे.
- बिरबलाच्या हातातील मांजर बघून सर्वजण हसणे.
- बिरबलाने उंदीर पकडण्याची स्पर्धा घेण्यास सांगणे. त्यात बिरबलाचे मांजर श्रेष्ठ ठरणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना मराठीतील नवीन शब्द, वाक्ये यांची ओळख होणे.
- विद्यार्थ्यांना गोष्टीच्या साहाय्याने मराठी विषयाची आवड निर्माण करणे व गोष्टीरूपाने बुद्धि चातुर्याचा वापर करणे हा संदेश देणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना अकबर-बिरबलाची एखादी गोष्ट सांगावी किंवा त्यांच्याकडून गोष्ट ऐकावी.

- विद्यार्थ्यांना पाठातील गोष्ट ही गोष्टीरूपाने किंवा नाट्यरूपाने समजावून सांगावी.
- पाठाचा अर्थ सांगत-सांगत पाठ समजावून सांगावा.
- पाठाखालील प्रश्नांवर सविस्तर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. बादशहाने प्रत्येक सरदाराला मांजर दिले.

२. बादशहाने मांजरीची पिल्ले दरबारात सहा महिन्यांनी आणायला सांगितली.

३. बिरबलाचे मांजर उंदीर पकडण्यात तरबेज झाले.

४. बिरबलाच्या हातातील हडकुळे मांजर पाहून बादशहाला हसू आले.

५. बादशहाने नोकराला दरबारात उंदीर सोडायला सांगितले.

**प्र २.** १. खुराक २. मांजर ३. मांजराचे

४. बक्षीस ५. दरबारात

**प्र ३.** १. मिठाई२. बिरबल ३. मांजर ४. पिल्लू

**प्र. ४.** १. चूक २. चूक ३. बरोबर ४. बरोबर

**प्र ५.** १. गृह २. दिन ३. महान

४. सावकाश/मंदगती ५. शरीर

**प्र ६.** १. वाईट २. रात्र ३. रडू ४. मागे

## १५ आळशी माकड

✦ **पाठ परिचय**

- पावसाळ्याचे दिवस असणे.
- माकडाचे पावसात भिजणे व घर बांधण्याचा विचार मनात येणे.
- पावसाचे थांबणे व माकडाचे चिंचेचा आंबट-गोड पाला खाण्यात घर बांधायचे विसरून जाणे.
- पावसाळा संपून हिवाळा येणे.
- कडाक्याच्या थंडीत माकडाचे कुडकुडणे व पुन्हा घर बांधण्याचा विचार करणे.
- सकाळी ऊन पसरल्यावर झाडावरची फळे खाण्यात दंग होणे व पुन्हा घर बांधायचे विसरून जाणे.
- उन्हाळा येऊन जाणे. पुन्हा पावसाळा सुरू होणे व अजूनही घर बांधले नाही याचे माकडाला वाईट वाटणे.
- कोणतेही काम वेळच्या वेळी करणे गरजेचे असते ही शिकवण देणे.

✦ **उद्देश**

- विद्यार्थ्यांना गोष्टीरूपाने नैतिक मूल्यांची शिकवण देणे.

- विद्यार्थ्यांना गोष्टीमार्फत मराठी विषयाची आवड निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांना मराठीतील नवीन शब्द, वाक्ये यांची ओळख होणे.

✦ **अध्यापन कृती**

- विद्यार्थ्यांना आळस करू नये या विषयावर आधारित एखादी गोष्ट सांगावी व विद्यार्थ्यांकडून आळस करू नये हा विषय काढून घेणे.
- शिक्षकांनी पाठ शिकविण्यापूर्वी पाठातील गोष्टीवर आधारित चित्रांची कार्डे बनवावीत.
- ती कार्डे दाखवत गोष्ट सांगावी.
- गोष्ट पूर्ण झाल्यावर पुन्हा एकदा कार्डे दाखवून गोष्टीची पुनरावृत्ती करावी.
- पाठाखालील प्रश्नांवर चर्चा करावी.

✦ **उत्तरे**

**प्र १.** १. पावसाळा सुरू झाला व हिवाळा सुरू झाला की माकडाच्या मनात घर बांधण्याचा विचार येई.

२. पाऊस थांबला व छान ऊन पडले की माकड पिंपळाच्या झाडावरून, चिंचेच्या झाडावरून उडी मारून आंबट-गोड चिंचेचा पाला खायला लागायचे व घर बांधायचे विसरून जायचे, तसेच हिवाळ्यात सकाळ झाली व ऊन पडू लागले की माकडाला मजा वाटायची, या झाडावरून त्या झाडावर उडी मारून फळे खाण्यात दंग व्हायचे व घर बांधायचे विसरून जायचे.

३. माकड पावसाळ्यात ठरवायचे पाऊस संपताच कामाला लागायचे. थंडी कमी झाली की कामाला लागायचे; पण अशा प्रकारे ठरवलेले काम वेळीच न केल्यामुळे व आळशीपण ाामुळे माकडाचे घर बांधून झाले नाही.

४. ठरवलेले काम जर वेळीच केले नाही तर माकडासारखा पश्चाताप होतो. ते पूर्ण करण्यासाठी कोणतेही काम वेळीच केले पाहिजे.

प्र **२.** १. चूक २. चूक ३. बरोबर

४. बरोबर ५. बरोबर

**प्र ३.** १. उन्हाळा- **उन्हाळ्यात** मी आजोळी जातो.

२. वारा- आज संध्याकाळी थंड **वारा** वाहू लागला होता.

३. घर- माझे **घर** मंदिर आहे.

४. छान- बागेत फुलांना पाहून **छान** वाटते.

५. पाऊस- आज सकाळपासून मुसळधार **पाऊस** पडत आहे.

**प्र ४.** १. अनेक २. संध्याकाळ ३. गरम

४. जास्त ५. पांढरे

**प्र ५.** १. वानर २. वर्षा ३. मेघ
४. सदन ५. गगन ६. गुंग

**प्र ६.** १. अनेकवचन २. एकवचन ३. अनेकवचन
४. एकवचन

✦ **हसत-खेळत**

**प्र ७.** विद्यार्थी चित्राचे निरीक्षण करून आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार चित्रवर्णन करतील.

## मराठी अंकज्ञान

✦ **चला अभ्यास करूया**

**प्र १.** २१ २२ २३ २४ २५ २६ २७ २८ २९ ३०
३१ ३२ ३३ ३४ ३५ ३६ ३७ ३८ ३९ ४०
४१ ४२ ४३ ४४ ४५ ४६ ४७ ४८ ४९ ५०

**प्र २.** क. ४५ ख. २६ ग. ४० घ. ३०
च. ३३ छ. २५ ज. ४३ झ. ३७